आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in

शुक्रवार दिनांक 20/02/२०२6

METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 66 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# छत्रपती शिवरायांच्या मार्गावर चालणे हाच विकासाचा खरा मार्ग-मुख्यमंत्री

## किल्ले शिवनेरीवर छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव साजरा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : छत्रपती शिवरायांनी दिलेला मार्ग हाच सर्वांगीण विकासाचा मार्ग आहे. त्यांच्या कार्याचा हा आदर्श जगासमोर ठेवण्यासाठी 2030 साली छत्रपती शिवाजी महाराजांची 400 वी जयंती भव्य आणि जागतिक स्तरावर साजरी केली जाईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.**



किल्ले शिवनेरीवर आयोजित शिवजन्मोत्सव सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार, सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार, आमदार शरद सोनवणे, माजी आमदार अतुल बेनके, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, जिल्हा पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, उपवनसंरक्षक आशिष ठाकरे, अभिनेता रितेश देशमुख, मराठा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष विजय घोगरे आदी उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराज नसते तर आज भारताचा इतिहास आणि भूगोलही वेगळा असता असे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, अनेक राजे-रजवाडे मोगलांच्या अधिपत्याखाली काम करत असताना आई जिजाऊंनी घडविलेल्या छत्रपती शिवरायांनी रयतेचे स्वराज्य स्थापन करून हिंदुस्थानाला नवी दिशा दिली. छत्रपती शिवरायांनी 18 पगड जातींच्या मावळ्यांना एकत्र करून स्वराज्याची स्थापना केली. 'हे माझे राज्य नसून रयतेचे राज्य आहे,' अशी भूमिका त्यांनी घेतली. देव, देश आणि धर्मासाठी लढा देण्याची प्रेरणा देत त्यांनी सामान्य जनतेला मोगलांच्या जोखडातून मुक्त करण्याचे कार्य केले. त्यांच्या राज्यात समता, सन्मान, न्याय आणि स्त्रीसुरक्षा यांना प्राधान्य होते. शेतकरी समाधानी राहील, अन्याय-अत्याचार होणार नाहीत, अशी राज्यव्यवस्था त्यांनी उभी केली, असे मुख्यमंत्री म्हणाले. राज्यकारभारात विविध सुधारणा करताना शिवाजी महाराजांनी सुमारे 50 प्रकारचे कर रद्द करून सुटसुटीत करप्रणाली निर्माण केली. पाणी, जंगल यांचे नियोजन केले. भविष्यातील धोका ओळखून समुद्रमार्गे होणाऱ्या आक्रमणांना रोखण्यासाठी जलदुर्ग उभारले. पोर्तुगीजांवर विजय मिळवून पश्चिम किनारपट्टी सुरक्षित केली. छत्रपतींच्या कारकिर्दीत समुद्रमार्गे आक्रमण करण्याची हिंमत कुणालाही झाली नाही, अशा शब्दात त्यांनी महाराजांचे द्रष्टेपण मांडले. शिवरायांच्या पराक्रमाची साक्ष राज्यातील गड किल्ले देत असल्याचे नमूद करीत मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले, पंतप्रधानांच्या पुढाकाराने शिवनेरीसह छत्रपती शिवाजी महाराजांचे 12 किल्ले जागतिक वारसा स्थळ म्हणून नामांकित झाले असून 27 देशांनी एकमताने त्यास मान्यता दिली आहे. सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी संबंधित प्रमाणपत्र स्वीकारले. त्यामुळे शिवरायांचे किल्ले आता अधिकृतपणे जागतिक वारसा स्थळ म्हणून गौरवले गेले आहेत. शिवरायांच्या कार्याची साक्ष असलेले राज्यातील सर्व किल्ले अतिक्रमणमुक्त करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे त्यांनी सांगितले. मराठा सेवा संघाच्या निवेदनावर राज्य सरकार सकारात्मक काम करेल, तसेच मांडण्यात आलेल्या सर्व मुद्द्यांवर विचार करण्यात येईल, अशी ग्वाही देऊन मुख्यमंत्री फडणवीस राज्यातील आणि जगभरातील शिवप्रेमींना शिवजयंतीच्या शुभेच्छा दिल्या. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यातील प्रत्येक घटकाची काळजी घेण्याची शिकवण आपल्याला दिली असून त्याच विचारांवर आणि रयतेचं राज्य' या संकल्पनेवर राज्य सरकार पुढे वाटचाल करीत आहे. शिवछत्रपतींच्या स्वप्नातील सुजलाम सुफलाम, न्याय आणि समृद्ध स्वराज्य घडवण्यासोबतच यापुढेही महाराष्ट्राच्या सर्वांगिण विकासासाठी राज्य सरकार कटिबद्ध राहील, असा विश्वास उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी व्यक्त केला.

# रोहित पवारांना सुरक्षा द्या-खा.सुप्रिया सुळे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाबाबत आमदार रोहित पवार हे मुद्दे उपस्थित करत आहेत. ते अस्वस्थ असून, त्यांची काळजी वाटत आहे. त्यामुळे राज्य सरकारने त्यांना सुरक्षा द्यावी,' अशी मागणी खासदार सुप्रिया सुळे यांनी केली.**

पुण्यात प्रसार माध्यमांशी बोलताना खासदार सुळे म्हणाल्या, 'अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूनंतर अनेक शंका व्यक्त केल्या जात आहेत. जनभावना तीव्र असून आमदार रोहित पवार हे अतिशय अभ्यासपूर्ण काही तथ्ये, शंका उपस्थित करत आहेत. त्यांची उत्तरे जनतेला मिळाली पाहिजेत. या घटनेतील सत्य लोकांसमोर पारदर्शक पद्धतीने पुढे येणे अतिशय गरजेचे आहे.

मात्र, आमदार रोहित पवार यांची काळजी वाटत असल्याने त्यांना राज्य सरकारने सुरक्षा द्यावी.' 'विमान अपघातात 'ब्लॅक बॉक्स' नष्ट होऊ शकत नाहीत. दुर्घटनेचे पारदर्शक आणि निर्विवाद सत्य पुढे आले पाहिजे. या प्रकरणाच्या चौकशीची मागणी जय पवार यांनीही केली आहे.' असे खासदार सुळे यांनी स्पष्ट केले.


दोन्ही 'राष्ट्रवादी' विलीन करण्याबाबत खासदार सुळे म्हणाल्या, 'मुंबईत झालेल्या बैठकीला मी नव्हते. खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी भूमिका मांडली आहे. माझा भाऊ गेला. त्याचे दुःख आयुष्यभरातील भरून येणार नाही. आमचा कुटुंब प्रमुख राहिला नाही, तर आता कोणाबरोबर खरे-खोटे करत बसायचे? आम्हाला एकत्र काम करण्याची इच्छा होती. आता या गोष्टीला पूर्णविराम द्यावा. वास्तव काय आहे, हे मला आणि अजितदादांना माहीत होते.'



# महानगरपालिकेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ एक महान योद्धा नव्हते, तर स्वराज्य, लोककल्याण, न्याय आणि सुशासनाचे तेजस्वी प्रतीक होते,त्यांच्या दूरदृष्टीतून उभे राहिलेले स्वराज्य आजही आपल्याला आत्मसन्मान, धैर्य आणि राष्ट्रनिष्ठेची प्रेरणा देते. छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्वधर्मसमभाव, स्त्रीसन्मान,शेतकरी आणि प्रजेच्या कल्याणाला सर्वोच्च स्थान दिले. त्यांच्या याच मूल्यांची जोपासना करणे हीच आपली जबाबदारी आहे, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनातील त्यांच्या प्रतिमेस तसेच पी.एम.टी चौक भोसरी, लांडेवाडी चौक, पिंपरी येथील हिंदुस्थान अँटीबायोटिक्स कॉलनी येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास महापौर रवि लांडगे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले, त्यावेळी ते बोलत होते. या अभिवादन प्रसंगी खासदार मेधा कुलकर्णी, माजी महापौर तथा नगरसदस्य योगेश बहल, नगरसदस्य जितेंद्र ननावरे, नगरसदस्या वर्षा जगताप, माजी नगरसदस्य मारुती भापकर, माजी उपमहापौर महंमदभाई पानसरे, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उप आयुक्त अण्णा बोदडे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सहाय्यक सुरक्षा अधिकारी प्रमोद निकम, लिपिक अभिजित डोळस यांच्यासह भक्ती शक्ती शिवजयंती उत्सव समितीचे पदाधिकारी आणि विविध क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कैलास बारणे यांना 'स्वीकृत नगरसेवक' म्हणून संधी द्या ; राष्ट्रवादीची मागणी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे माजी नगरसेवक कैलास बारणे यांना महापालिका सभागृहात 'स्वीकृत नगरसेवक' म्हणून संधी देण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे.**

**नगरसेविका योगिता महेश बारणे यांनी विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांना निवेदन देत ही मागणी केली.**





योगिता बारणे यांनी निवेदनात नमूद केले की, त्यांच्या नगरसेवक पदाच्या प्रवासात कैलास (बाबा) बारणे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पॅनेलमधून वॉर्ड क्र. क–23, थेरगाव गावठाण येथून उमेदवारीची संधी दिली. निवडणुकीदरम्यान त्यांनी प्रामाणिकपणे व निष्ठेने संपूर्ण पॅनेलचे नेतृत्व करत पक्ष संघटना अधिक बळकट केली.

कैलास बारणे यांचा समाजकारणातील दीर्घ अनुभव, सर्वसामान्य नागरिकांशी असलेला जवळचा संपर्क आणि शहर विकासासाठी असलेली तळमळ लक्षात घेता त्यांना पुन्हा एकदा अधिकृत संधी मिळावी, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. नगरसेवक संदीप वाघेरे, यश दत्ता काका साने, नगरसेविका मायाताई बारणे यांच्या वतीने नगरसेविका योगिता महेश बारणे यांनी भाऊसाहेब भोईर यांना निवेदन दिले आहे. या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, माजी नगरसेवक कैलास बाबा बारणे यांना स्वीकृत नगरसेवक म्हणून पिंपरी चिंचवड महानगरपालिका सभागृहात संधी द्यावी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कैलास बारणे यांनी प्रामाणिकपणे व प्रचंड मेहनतीने राष्ट्रवादी पक्षाचे काम केले आहे. पक्ष संघटना म्हणून त्यांनी उत्तमरीत्या कामगिरी केली आहे तसेच अनेक वर्षापासूनचा त्यांचा सामाजिक व राजकीय कामाचा अनुभव पाहता तसेच मागील 2017 च्या निवडणुकीत यश मिळवत 2017 मधील त्यांचा नगरसेवक पदावर काम करण्याचा अनुभव पाहता त्यांना परत एकदा महापालिका सभागृहात पाठवून नगरसेवक पदावर काम करण्याची संधी द्यावी, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शुक्रवार दिनांक 20/02/२०२६

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# राष्ट्रवादी वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांना जयंती निमित्त अभिवादन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मध्यवर्ती कार्यालय, खराळवाडी, पिंपरी येथे "शिवजयंती" निमित्त शहराध्यक्ष योगेश मंगलसेन बहल यांच्या मार्गदर्शनात शहरातील प्रमुख पदाधिकारी यांच्या हस्ते "श्री. छत्रपती शिवाजी महाराज" यांच्या प्रतीमेस पुष्पहार अर्पन करून अभिवादन करण्यात आले.**




शहराध्यक्ष योगेश बहल आपले मनोगत व्यक्त करतांना म्हणाले की, शिवाजी महाराज हे एक सर्वगुण संपन्न असे व्यक्ती होते. काळ्याकुट्ट अंधारात आपली दिशा ठरवून वाट काढत, कितीही संकटे आले तर डगमगून न जाता त्यावर शिताफीने मात करत. शिवराय हे केवळ राजे नव्हते, तर ते एक प्रजेचे कैवारी होते. अन्याय, अत्याचार करणाऱ्यांचा त्यांनी चोख बंदोबस्त केला. परकीय आक्रमकांना देशातून हाकलून लावण्यासाठी त्यांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने बलाढ्य शत्रूंशी लढा देत एका वीर पुत्राने गुलामी नाकारत स्वराज्य निर्माण केले. महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासामध्ये शिवाजी महाराजांचा मोठा प्रभाव असून छत्रपती शिवाजी महाराज हे आपल्या अस्मितेचा एक अविभाज्य भाग आहेत.

यावेळी महिला अध्यक्षा कविता आल्हाट आणि ॲड गोरक्ष लोखंडे यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी, शहराध्यक्ष योगेश बहल, महिला अध्यक्षा कविता आल्हाट, प्रदेश सरचिटणीस ॲड. गोरक्ष लोखंडे, ज्ञानेश्वर कांबळे, कार्याध्यक्ष विजय लोखंडे, मुख्य सरचिटणीस विनायक रणसुभे, प्रदेश कार्याध्यक्ष ओबीसी ॲड.सचिन औटे, मा.नगरसेवक प्रकाश सोमवंशी, नगरसेवक जितेंद्र ननावरे, वर्षा जगताप, मनिषा लांडे, सामाजिक न्याय विभाग अध्यक्ष संजय औसरमल, सेवादल अध्यक्ष ज्ञानेश्वर उर्फ माऊली मोरे, झोपडपट्टी सेल अध्यक्ष रविंद्र ओव्हाळ, महिला कार्याध्यक्ष कविता खराडे, कामगार अध्यक्ष युवराज पवार, उपाध्यक्ष अमोल भोईटे, संपतराव पाचुंदकर, अभिजीत आल्हाट, दत्तात्रय जगताप, भाग्यश्री म्हस्के, रिना तोरणे, अरूण पवार, ॲड निशा कांबळे, अर्बन सेल अध्यक्ष प्रदीप गायकवाड, कुमार कांबळे, ॲड वसंत कांबळे, सरविंदर सिंग बाला, पवन खराडे, संजय साळवे, बापू सोनवणे, विक्रम पवार, गणेश गायकवाड, धनाजी तांबे, सुनिल अडागळे इत्यादी पदाधिकारीसह आदि उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार सेवादल अध्यक्ष ज्ञानेश्वर मोरे यांनी मानले.

# भोसरी एमआयडीसीत शिवजयंती उत्साहात साजरी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

भोसरी एमआयडीसी औद्योगिक परिसरात छत्रपती शिवाजी महाराज जयंती अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. औद्योगिक क्षेत्र शिवमय झाले असून उद्योजक, कामगार व महिला भगिनी मोठ्या संख्येने या सोहळ्यात सहभागी झाले. कार्यक्रमाचे आयोजन इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष अभय भोर यांच्या पुढाकाराने करण्यात आले. तसेच दुर्गा ब्रिगेड पक्षाच्या अध्यक्षा दुर्गा भोर यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवजयंती मोठ्या जल्लोषात साजरी झाली.



कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण व आरती करून करण्यात आली. त्यानंतर उपस्थितांनी शिवरायांच्या विचारांचा जागर करत औद्योगिक क्षेत्रात एकता, शिस्त आणि राष्ट्रभक्तीचा संदेश दिला.

यावेळी पारंपरिक शस्त्रांची सलामी देत महाराजांना मानवंदना अर्पण करण्यात आली. अवंतिका भोर यांनी शौर्यपूर्ण प्रात्यक्षिक सादर करत उपस्थितांची दाद मिळवली. कार्यक्रमानंतर सर्वांना पेढे वाटून शिवजयंतीच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

या भव्य उत्सवामुळे भोसरी एमआयडीसी परिसरात उत्साह आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले. शिवरायांच्या आदर्शांवर चालत उद्योग क्षेत्रात प्रगती साधण्याचा संकल्प यावेळी सर्वांनी व्यक्त केला.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शुक्रवार दिनांक 20/02/२०२६

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# 'शिवगर्जना' हे महानाट्य युवकांना सामाजिक बांधिलकीची प्रेरणा देणारे

## थोर सामाजिक कार्यकर्ते मनोज जरांगे पाटील यांचे प्रतिपादन

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी – 'शिवगर्जना' महानाट्याच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्य स्थापनेमागील उद्देश, लोकाभिमुख प्रशासन आणि सर्वसामान्यांच्या हितासाठी केलेला संघर्ष प्रभावीपणे दाखविण्यात येत आहे. आजच्या काळात इतिहास केवळ लक्षात ठेवण्याचा विषय राहिलेला नाही, तर त्यातून प्रेरणा घेऊन सामाजिक बांधिलकी जपण्याची गरज आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्य उभे करताना न्याय, समता आणि कष्टकऱ्यांच्या हिताला केंद्रस्थानी ठेवले होते. हीच भूमिका आजच्या तरुणांनी स्वीकारली, तर समाजात सकारात्मक बदल घडू शकतो. युवकांमध्ये राष्ट्राभिमान जागवण्याबरोबरच समाजासाठी काहीतरी करण्याची जाणीव निर्माण करण्याची ताकद या महानाट्याच्या सादरीकरणात आहे, असे प्रतिपादन थोर सामाजिक कार्यकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी केले.**



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित 'विचार प्रबोधन पर्व'अंतर्गत सादर करण्यात आलेल्या 'शिवगर्जना' या भव्य महानाट्याचा दुसरा प्रयोग बुधवारी 18 फेब्रुवारी रोजी निगडी येथील नियोजित महापौर निवास परिसरात मोठ्या उत्साहात पार पडला. या महानाट्यास थोर सामाजिक कार्यकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी उपस्थित राहून संपूर्ण महानाट्य पाहिले, त्यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य ॲड.गोरक्ष लोखंडे, उपमहापौर शर्मिला बाबर, माजी नगरसदस्य मारुती भापकर, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उप आयुक्त अण्णा बोदडे,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते प्रकाश जाधव,वैभव जाधव,संतोष सातपुते, आबासाहेब ढवळे, सतीश काळे, संतोष कवडे,श्रीमंत जगताप,नागनाथ म्हस्के, ज्ञानेश्वर लोभे, सचिन आल्हाट, संदीप निकम, कुणाल कांबळे, सचिन बोराडे, संदीप बोराडे, सागर तापकीर,जीवन बोराडे, स्वप्निल शिंदे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिवगर्जना महानाट्याद्वारे ऐतिहासिक घटनांवर आधारित प्रसंगांचे प्रभावी सादरीकरण, भव्य नेपथ्यरचना, पारंपरिक वेशभूषा आणि आधुनिक तांत्रिक साधनांच्या सहाय्याने उभारण्यात आलेल्या दृश्यांमुळे उपस्थित प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. सादरीकरणादरम्यान अनेक प्रसंगांना प्रेक्षकांनी उत्स्फूर्त दाद देत टाळ्यांचा कडकडाट केला.

या महानाट्यातून स्वराज्य स्थापनेचा संघर्ष, किल्ल्यांच्या लढाया, आरमार उभारणी तसेच शिवकालीन प्रशासनव्यवस्थेचे विविध पैलू नाट्यमय पद्धतीने उलगडण्यात आले. कलाकारांच्या जिवंत अभिनयातून साकारलेल्या प्रसंगांमुळे इतिहासाचा थरार अनुभवण्याची संधी उपस्थितांना मिळाली.


कार्यक्रमाच्या अनुषंगाने महापालिकेच्या वतीने नागरिकांसाठी स्त्री,पुरुषांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह,पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, आवश्यक नागरी सुविधा, सुरक्षा व्यवस्था तसेच वाहतूक नियोजन करण्यात आले होते.

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त निगडी येथील भक्ती शक्ती समूहशिल्प उद्यान येथे भक्ती शक्ती शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने रात्री भव्य फटाक्यांच्या आतषबाजीचे आयोजन करण्यात आले होते. आकर्षक प्रकाशरेषा, रंगांची उधळण आणि विविध आकाशदीपांच्या सादरीकरणामुळे संपूर्ण परिसर उजळून निघाला होता. उपस्थित नागरिकांनी मोठ्या उत्साहात या आतषबाजीचा आनंद घेत जयंती सोहळ्याला जल्लोषमय वातावरणात साजरे केले. या नेत्रदीपक आतषबाजीमुळे परिसरात उत्सवाचे वातावरण निर्माण झाले होते.

# पी.के इंटरनॅशनल स्कूलमध्ये शिवजयंती उत्साहात साजरी

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपळे सौदागर येथील पी.के इंटरनॅशनल स्कूलमध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाला भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न उर्फ बापू काटे, नगरसेविका अनिता काटे तसेच नगरसेविका कुंदाताई भिसे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.**



कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उपस्थित मान्यवरांनी आदरांजली वाहिली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कला सादरीकरणे सादर केली. पारंपरिक वेशभूषेत सजलेल्या विद्यार्थ्यांनी लेझीम खेळ तसेच मर्दानी खेळांचे प्रभावी सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. देशभक्तीपर नृत्य आणि विविध खेळांचेही उत्कृष्ट प्रदर्शन करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या सहभागातून भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. "जय भवानी, जय शिवाजी"च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला आणि संपूर्ण वातावरण शिवमय झाले.

कार्यक्रमादरम्यान मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शिवरायांच्या शौर्य, दूरदृष्टी आणि सुशासनाच्या आदर्शांची माहिती देत त्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संदेश दिला.

यावेळी शत्रुघ्न काटे म्हणाले, "शिवजयंतीसारख्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाबद्दल अभिमान आणि देशभक्तीची भावना जागृत होते. आजच्या पिढीने शिवरायांच्या आदर्शांचा स्वीकार करून शिस्त, प्रामाणिकपणा आणि समाजाप्रती कर्तव्यभावना जोपासावी. अशा शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण आणि सकारात्मक विचारांची जडणघडण होते."

या उत्साहपूर्ण कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये प्रेरणा आणि अभिमानाची भावना अधिक दृढ झाली.

याप्रसंगी शाळेचे संस्थापक अध्यक्ष श्री. जगन्नाथ आप्पा काटे, उद्योजक श्री. सोमनाथशेठ काटे, श्री. संजयशेठ भिसे, श्री. संदेश काटे पाटील, श्री. रोहन काटे तसेच शिक्षक, पालक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968